लोकसत्ता

# आयन एक्स्चेंजकडे पाणी शुद्धीकरण व समुद्रापासून गोड पाणी तयार करण्याचे तंत्रज्ञान उपलब्ध

■ व्यापार प्रतिनिधी

आयन एक्स्चेंज (इंडिया) लिमिटेड या मुंबईमध्ये मुख्य कार्यालय असणाऱ्या कंपनीने भारतामधील पाणी समस्येवरील उपाययोजनांची मुहूर्तमेढ रोवली असून, कंपनीतर्फे पाणी शुध्दीकरणाचा प्रकल्प उभारण्यासाठी तसेच समुद्राचे खारे पाणी गोडे करण्याचे तंत्रज्ञानही उपलब्ध झाले आहे. उद्योग, संस्था, व्यापार, मूलभूत सुविधा, नागरी, गृह आणि ग्रामीण व शहरी असे दोन्ही समाज अशा प्रत्येक क्षेत्रासाठी एकसंघ उपाययोजनांची निर्मिती करणाऱ्या तंत्रज्ञान, प्रक्रिया, उत्पादने व सेवा यांचे सर्व प्रकार असणाऱ्या संपूर्ण जगातील फार थोड्या कंपन्यांपैकी ही एक आहे.

मुंबई आणि नवी मुंबई हे सातत्याने अनियमित होत जाणाऱ्या पावसावर अवलंबून असून, त्यामुळे तलावातून होणारा पाणीपुरवठा कमी होत चाललेला आहे. वाया गेलेल्या पाण्याचा पुनर्वापर आणि समुद्राच्या पाण्याचे क्षारांपासून शुद्धिकरण हे पाणीपुरवठ्यासाठी टिकाऊ, दुष्काळाचा परिणाम न होणारे आणि पर्यावरणदृष्ट्या योग्य असे पाणीपुरवठ्याचे पर्यायी स्त्रोत आहेत. पावसाळी पाण्याचा साठा केल्यानेदेखील जमिनीत पाणी मुरणे आणि पाण्याचा साठा वाढणे या गोष्टींना चालना मिळेल आणि भूगर्भातील पाण्याचे साठे (विहिरींमधील) यातून मिळणारा पाणीपुरवठा वाढेल आणि तो नागरी पाणीपुरवठ्यास पूरक ठरेल.

गाळ, सांडपाणी आणि औद्योगिक क्षेत्रांतून सोडण्यात येणारे पाणी हे पुनर्वापर करण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या तंत्रज्ञानाच्या साह्याने ९९ टक्क्यांपर्यंत पाणी पुन्हा मिळविण्यासाठी- जे वाया जाण्याची पातळी शून्यापर्यंत नेऊ शकेल असा, पाण्याचा स्त्रोत बनू शकते. पुरवठा झालेल्या २७७० एमएलडीपैकी, ८० टक्के हे सांडपाण्यात रुपांतरित होते आणि फक्त ६० टक्के सांडपाण्यावर नियंत्रण असलेल्या या शहरामध्ये केवळ १५ टक्के सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याची क्षमता (यंत्रणा) आहे. केवळ एकाच टप्प्यामध्ये उच्च दर्जाचे पाणी मिळविण्यासाठी, अगदी सांडपाण्यापासूनदेखील संपूर्ण जगामध्ये अल्ट्रा फिल्टरेशनचा यशस्वीरीत्या वापर केला जात आहे. आयन एक्स्चेंजने या प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून फार मोठ्या संख्येने प्रकल्पांची यशस्वी उभारणी केली आहे. ■